# नियमित दिवाणी मुकदमा क्र.२४०/८८ मधील नि.क्र.१ वरील आदेश

१. आज वादी न्यायालयासमक्ष हजर, प्रतिवादी गैरहजर. वादीतर्फे अर्ज नि.क्र.१४१ दाखल करुन नि.क्र.९१ अन्वये पारीत झालेला आदेश पुर्वस्थितीत ठेवण्याकरिता विनंती केली. वादीतर्फे असे निवेदन करण्यात आले की, सदरचे प्रकरण हा मा. उच्च न्यायालय यांनी स्थगित केलेला आहे. वादीने या न्यायालयाचे लक्ष सिव्हील रिव्हीजन अर्ज क्र.३९८/९३ यामध्ये दि.१४/१०/२०१५ रोजी पारीत झालेल्या आदेशाच्या झेरॉक्स प्रतीकडे वेधले. त्यावरुन सदरचे प्रकरण स्थगित असल्याचे पहिल्यांदा निदर्शनास आले आहे.

२. सदर प्रकरणाच्या रोजनामा व नि.क्र.१ चे अवलोकन केले असता सदर प्रकरण स्थगित असल्याबाबत कोणतीही नोंद त्यावर घेण्यात आलेली नव्हती. तसेच सदरचा अर्ज नि.क्र.९१ हा मागील कित्येक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे दिसून आले. तसेच सदर प्रकरण स्थगित असल्याबाबत कोणतेही रिट पूर्ततेकरिता प्राप्त झाले नव्हते.

३. प्रस्तुत दाव्यात मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडून सिव्हील अर्ज क्र.३३९/२०१५ मधील रिट पूर्ततेकामी या न्यायालयात प्राप्त झाले होते. सदर रिटची पूर्तता दि.१७/५/२०१६ रोजी करण्यात आली होती. त्या रिटवरील आदेशाचे अवलोकन केले असता वादी यांनी सदरचे प्रकरण मा. मुंबई उच्च न्यायालयात काढून घेतल्याने सदरचे रिट नस्तीबंद करण्यात आले होते असे दिसून आले. सबब सदरचे प्रकरण जुने असल्याने व त्यावर नि.क्र.९१ हा अर्ज फार पूर्वीपासून प्रलंबित असल्याने सदरचा दावा स्थगित नाही असा नजरचुकीने गैरसमज होऊन या प्रकरणात नि.क्र.९१ वर दि.२२/१२/२०१६ रोजी आदेश पारीत करण्यात आले आहे.

४. सदर प्रकरण स्थगित असल्याबाबत रोजनाम्यावर व वादपत्र नि.क्र.१ यामध्ये कोठेही नोंद नव्हती. परंतु सदरचे प्रकरण मुंबई उच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन क्र.३९८/९३ या प्रकरणात स्थगित केले असल्याने प्रथमतःच आज वादीने या न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सबब सदर प्रकरण मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी स्थगित केले असल्यामुळे सदरचे प्रकरण स्थगित करण्यात येते व त्याबाबतची नोंद नि.क्र.१ वर व रोजनाम्यावर घेण्यात येते. सदर आदेशाची नोंद उभयपक्षांनी घ्यावी.

दि.७/१/२०१७ (मि. वि. बुराडे)

सह दि.न्या.क.स्तर, पंढरपूर

# CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

Name of Employee : Y.V. Sital (Jr. Clerk)
Court : Jt. Civil Judge Jr.Dn. Pandharpur
Date : 7-1-2017
Judgment/order signed by :
the Presiding Officer on : 7-1-2017
Judgment/Order uploaded on: 7-1-2017